| ८ | **संगणक शिक्षण योजना.** |
|---|---|
| | **यामध्ये संगणक शिक्षणाशी संबंधित योजनांचा समावेश होतो.** |
| | **आय.सी.टी. (Information & Communication Technology)** |
| | आय.सी.टी. (Information & Communication Technology) या केंद्र पुरस्कृत योजनेची अंमलबजावणी सन २००७-२००८ या वर्षात संदर्भ शासन निर्णय क्रमांक आयसीटी २००७/(८२/०७)/संगणक कक्ष, दिनांक-२७/१२/२००७ अन्वये राज्यात करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यातील ५०० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची निवड करण्यात आलेली आहे. निवड झालेल्या माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळामध्ये १० संगणकांसह सर्व साधनांनी सुसज्ज अशी प्रयोगशाळा मार्च, २००८ अखेर स्थापन करण्यात येणार आहे.<br>सदरहू योजना BOOT MODEL (Built Own Operate & Transfer) तत्वावर राबविली जात असून त्यासंबंधी मे.एन.आय.आय.टी.लि., चेन्नई या संस्थेशी दिनांक-२९.०२.२००८ रोजी संचालनालयातर्फे करार करण्यात आलेला आहे.<br>अ) पहिल्या टप्प्यात शैक्षणिकदृष्टया मागासलेल्या विकास गटातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व खाजगी अनुदानित शाळांचा समावेश करण्यात आलेला आहे.<br>ब) मे.एन.आय.आय.टी.लि., चेन्नई या संस्थेमार्फत ५०० शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळेची स्थापना करण्यात आलेली आहे.<br>क) संगणक साहित्याचा पुरवठा, दुरुस्ती व देखभाल, शैक्षणिक सॉफ्टवेअर, पूर्णवेळ प्रशिक्षित निर्देशक, फर्निचर व विद्युतीकरण इ. बाबी मे.एन.आय.आय.टी. संस्थेमार्फत संबंधित शाळेस पुरविण्यात आलेल्या आहेत.<br><br>मायक्रोसॉफ्ट आय. टी. ॲकेडमी यांच्या अद्ययावत साधनांनी युक्त अशा प्रशिक्षण केंद्रात एकावेळी ४० शिक्षकांचे प्रशिक्षण महिन्यातून दोन बॅचेसमध्ये होते. या प्रशिक्षण वर्गाचा कालावधी १२ दिवसांचा आहे.<br>प्रशिक्षण वर्गात संगणक प्रशिक्षक (Faculty) मायक्रोसॉफ्ट कपनीमार्फत नियुक्ती केलेले आहेत. या विभागातंर्गत सर्व जिल्ह्यांत प्राथमिक, माध्यमिक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य दृक श्रवण शिक्षण संस्था तसेच शासकीय कार्यालयातील कर्मचारी यांना मोफत संगणक प्रशिक्षण दिले जाते. त्यासाठी कंपनीमार्फत मराठीतून संगणक मार्गदर्शिका प्रत्येक प्रशिक्षणार्थीला प्रशिक्षणाच्या वेळी पुरविली जाते.<br>सन २००७-२००८ पासून BOOT MODEL तत्वावर माध्यमिक शाळांमध्ये आय.सी.टी. योजना राबविण्यात येत आहे. या विभागांतर्गत प्रत्येक जिल्ह्याची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे. |

| अ. क्र. | जिल्हा | सन २००७-०८ मध्ये कार्यान्वित झालेल्या संगणक प्रयोगशाळा | सन २००८-०९ मध्ये आय.सी.टी. योजनेसाठी प्रस्तावित केलेल्या शाळांची संख्या | जिल्ह्यातील एकूण माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | पुणे | १० | १०० | १२४८ |
| २ | सोलापूर | २७ | १०० | १०१२ |
| ३ | अहमदनगर | २१ | १०० | ९०० |